दिः08 फेब्रुवारी 2014

# अगस्टा वेस्टलँड संदर्भात राज्यसभेत संरक्षण मंत्र्यांचे वक्तव्य

**अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

5 फेब्रुवारी,2014 रोजी संरक्षण मंत्री ए.के.एंटनी यांनी राज्यसभेत एक वक्तव्य केले. त्यांचे वक्तव्य मीडियात झालेल्या खुलाशासंदर्भात होते, ज्यात इटलीच्या न्यायालयात अभियोजन तर्फे देण्यात आलेल्या दस्ताऐवजांचा संदर्भ होता. संरक्षण मंत्री यांनी सांगितले होते की, श्री गीदो हसचेक कडून प्राप्त दस्ताऐवजात दोन महत्त्वपूर्ण टिप्पणी आहेत. 'एफएएम' शब्द परिवार च्या बाजूने संदर्भ देतो, जे त्यांचे म्हणणे आहे की तो त्यागी परिवार आहे. ते हे नाही सांगू शकले की, 'एपी'शब्दाचा उल्लेख कशासाठी करण्यात आला. त्यांनी हे सुद्धा सांगितले आहे की, श्री क्रिश्चियन मायकेल द्वारे एक अन्य दस्ताऐवजात काही भारतीय नेत्यांना निशाणा बनविण्यात आला आहे.

याऐवजी संरक्षण मंत्र्यांकडून स्पष्टीकरण मागण्याची गरज आहे. मला वाटते की संसदेचे काम चालू नसल्यामुळे त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागणे शक्य नाही. प्रथम मी माझी शंका ठेवतो, जे मला वाटते की संरक्षण मंत्र्यांनी ते स्पष्ट करावे.

इटली च्या दलालाकडून 15 मार्च 2008 रोजी हस्तगत दस्ताऐवज भारतासंदर्भात इटलीच्या दलालाचे विचार सांगतात. “यात वीआयपी च्या मागे श्रीमती गांधी यांचा प्रेरक शक्ती च्या रुपात उल्लेख आहे, त्या एमआय-8 मध्ये आता नाही जाणार” या दस्ताऐवजात विभिन्न मंत्री आणि पक्षाचे पदाधिका-यांसह त्या लोकांची सूची आहे जे श्रीमती गांधी यांच्या जवळीचे आहेत.

अकाऊंट शीट वेगळी मिळाली आहे, ज्यात “राजनैतिक” शीर्षक चा वापर केला गेला आहे, ज्यत एपी चा उल्लेख आहे. पुढील प्रवीष्टी “एफएएम” ची आहे ज्याचा अर्थ परिवाराशी आहे.

स्पष्ट आहे की या सौदयात दलाली देण्यात आली आणि भारतीय व्यवस्थेला नुकसान पोचविण्यात आले. ठेक्याला रद्द करण्यात आले. मी आधीच सांगितले आहे की, ही नोट शीट आपल्याला 1987 मध्ये स्वीडन मध्ये हस्तगत मार्टीन आर्डबो च्या डायरीची आठवण करून देते, ज्यात 'क्यू' शब्दाचा उल्लेख होता. काय नोट शीट मध्ये शब्दाचा जो संक्षिप्त रुप दिले गेले आहे त्याचा अर्थ काढण्यासाठी राजकीय आखाड्यात काय हे रॉकेट सायन्स आहे? काय कोणत्या मध्यस्थी कडून'परिवार' बोलणे विचित्र नाही आहे?

जेव्हा कोणत्या विशेष अर्थाला सहजच समजले जाऊ शकते, तेव्हा परिवार शब्दाला भारतात जसे समजले जाते त्यापेक्षा वेगळा अर्थ का काढला जात आहे?